# कृषि पणन विषयक बातम्या : नोव्हेंबर 2023

सकाळ TODAY

Dt. 30/11/2023

### बारामतीला नवी ओळख : वर्षभरात ५ कोटी रुपयांहून अधिक उलाढाल

## कोष खरेदी-विक्रीची १०० टनाला गवसणी

▶ रविकिरण सासवडे

**काटेवाडी, ता. २९ :** राष्ट्रीय स्तरावर रेशीम बाजारपेठ म्हणून बारामतीला ओळख मिळू लागली आहे. महाराष्ट्रात प्रथमच बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती येथे बाजार समिती व संचालनालयाच्या समन्वयाने मागील वर्षी ई-नाम (इलेक्ट्रिक नॅशनल ॲग्रिकल्चरल मार्केट) पद्धतीने रेशीम कोष खरेदी-विक्री केंद्र सुरू केले होते. वर्षभरात या ठिकाणी पाच कोटी सात लाख ४२ हजार ६८ रुपये किमतीचे १ लाख ३९१ किलोग्रॅम कोष खरेदी करण्यात आले. अवघ्या वर्षभरातच रेशीम कोष खरेदीचा १०० टनाचा टप्पा ओलांडण्याची किमया बारामती येथील खरेदी-विक्री केंद्राने केली आहे.

केंद्र सरकाच्या ई-नाम मार्केटमुळे




रेशीम कोषाचे ऑनलाइन लिलाव होऊ लागले आहेत. परिणामी रेशीम कोषाला हक्काची बाजारपेठ मिळण्यास मदत झाली आहे.

बारामती येथील केंद्रावर रेशीम कोषाला एक क्विंटलला सरासरी ४१ हजार १०० रुपये सध्या दर मिळत आहे. सप्टेंबर २०२२ महिन्याच्या अखेरीस बारामती

येथे केंद्रीय रेशीम मंडळाच्या सहकार्यातून कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रेशीम कोष खरेदी विक्री केंद्रामध्ये कोष गुणवत्ता तपासणी केंद्र सुरू केले होते.

**वर्षभरातील उलाढाल**

| | |
|---|---|
| शेतकरी संख्या | १,२६५ |
| कोष खरेदी किलोग्रॅममध्ये | १ लाख ३९१ |
| खरेदी रक्कम | ५,०७,४२,०६८ |

# मॅग्नेट व स्मार्ट प्रकल्पांमध्ये बाजार समित्यांचा समावेश करण्यासाठी आपण प्रयत्नशील-पुरी



**जळगांव :-** जळगांव जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव व संचालक यांची एक दिवसीय कार्यशाळा जैन हिल्स येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगांव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने २९ नोव्हेंबरला आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या आयोजना मागील भुमिका संतोष बिडवई (जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगांव) यांनी सांगितली आणि त्यांनी बाजार समित्यांसाठी ज्या ज्या काही वेगवेगळ्या योजना आहेत त्याची माहीती देवून काही अडचणी सदर विषयाच्या अनुषंगाने असतील तर सचिवांनी व संचालकांनी आपल्याशी थेट संपर्क साधण्याचे आवाहन देखील त्यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नाशिकचे उपसरव्यवस्थापक पुरी यांनी बाजार समित्यांसाठी ज्या काही वेगवेगळ्या योजना आहेत त्या कशाप्रकारे राबविण्यात याव्यात याबद्दल माहीती दिली आणि आपण मॅग्नेट व स्मार्ट प्रकल्पामध्ये बाजार समितींचा समावेश करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. शेतमाल तारण योजना ही प्रकर्षाने बाजार समितीमध्ये राबविण्यात यावी अशी सूचनाही त्यांनी केली आणि चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीसह जळगांव जिल्ह्यातील एक दोन बाजार समित्या या उपक्रमाच्या अनुषंगाने जो काही प्रयत्न करत आहेत त्याचेही त्यांनी कौतुक केले आणि शेतमाल तारण योजना राबविण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीकडे निधी नसेल तर मंडळ ६ टक्के दराने कृषी उत्पन्न बाजार समितीला शेतमाल तारण योजनेसाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देईल असेही ते म्हणाले.

आयोजित कार्यशाळेत चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव जगदीश लोधे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या हिताच्या ज्या काही योजना व उपक्रम राबवित आहे त्याबद्दलची सविस्तर माहीती दिली आणि चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी बांधवांसाठी मोफत वजन काटा उपलब्ध करून दिला आहे. शिवाय शुध्द पिण्याचे पाणी, अल्पदरात वैद्यकीय सुविधा देखील दिल्याचे त्यांनी सांगितले. चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळाने उपसरव्यवस्थापक पुरी यांना निवेदन देवून त्यांना येत असलेल्या अडचणी सांगितल्या.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन नाशिक विभागीय कार्यालयातील रविंद्र देशमुख, श्री.टापसे, अत्तरदे, जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील गाढे व कर्मचारी उपस्थित होते.

Dt. 26/11/2023

# बाजार समिती पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा उत्साहात

## कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृषी मंडळ पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे (एनआयपीएचटी) यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २४) बाजार समिती पदाधिकारी व सचिव यांची कार्यशाळा झाली. कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील बाजार समित्यांचे पदाधिकारी व सचिव सहभागी झाले होते.

जिल्हा उपनिबंधक नीलकंठ करे व बाजार समिती सभापती भारत पाटील यांच्या हस्ते या कार्यशाळेचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक करताना पणन मंडळाचे उपविभागीय उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे पदाधिकारी व सचिव यांच्यासाठी एकदिवसीय कार्यशाळांचे आयोजन केल्याचे सांगितले. कार्यशाळेच्या निमित्ताने पणन संबंधित महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रके यांची पुस्तिका तयार केली असून, ती बाजार समित्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांना व सचिवांना कामकाज करताना उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

'कृषी पणन कायदा व त्यामधील महत्त्वाच्या सुधारणा' याविषयी जिल्हा उपनिबंधक करे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. बाजार समितीचे अधिकार व कर्तव्य याबाबत बिपीन मोहिते यांनी मार्गदर्शन केले. केंद्र शासनाच्या कृषी पणनविषयक असणाऱ्या विविध योजनासंबंधी उपकृषी पणन सल्लागार ऋग्वेंद्र मुरगोड (मुंबई) यांनी मार्गदर्शन केले. शेतमालाची निर्यात व कृषी पणन मंडळाचे योगदान याविषयी उपसरव्यवस्थापक मिलिंद जोशी यांनी मार्गदर्शन केले. बाजार समित्यांसाठी असणाऱ्या पणन मंडळाच्या विविध संगणक प्रणाली यासंदर्भात संगणक व्यवस्थापक कैलास फटांगरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बाजार समित्यांच्या रँकिंगमध्ये जिल्ह्यात प्रथम आल्याबद्दल बाजार समिती सभापती पाटील व सांगली जिल्ह्यातून प्रथम आल्याबद्दल आटपाडी बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी यांच्यासह संचालक मंडळ व सचिव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा लेखापरीक्षक किरण पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



कोल्हापूर : कार्यशाळेचे उद्घाटन करताना नीलकंठ करे. सोबत पणनचे उपसरव्यवस्थापक सुभाष घुले व इतर. (छाया : पांडुरंग पाटील)

Smart Kolhapur Edition
Nov 26, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

ऐक्य

Dt. 26/11/2023

# जिल्ह्यातील बाजार समितीच्या पदाधिकारी व सचिवांच्या कार्यशाळेस प्रतिसाद



उद्घाटन करताना मान्यवर. सोबत पदाधिकारी, संचालक व सचिव.

**फलटण** दि. २५ : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे (NIPHT) यांच्या संयुक्त सहभागाने हॉटेल जॅक्सन इन, फलटण येथे सातारा जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांचे पदाधिकारी व सचिव यांची पणनविषयक एक दिवसीय कार्यशाळा नुकतीच झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी ११ वाजता पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे उपसंचालक अविनाश देशमुख यांच्या हस्ते बाजार समित्यांचे सभापती यांचे उपस्थितीत दीपप्रज्वलन करून करण्यात आले यावेळी उपनिबंधक, कराड संदीप जाधव, पणन मंडळ, कोल्हापूर विभागीय कार्यालय उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण पांडुरंग रोकडे, सातारा जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व फलटण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव शंकरराव सोनवलकर आणि बाजार समित्यांचे सचिव उपस्थित होते.

पणन मंडळ, कोल्हापूर विभागीय कार्यालय उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी प्रारंभी स्वागत केल्यानंतर प्रास्ताविकात पणन मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून आणि कार्यकारी संचालक संजय कदम व कृषी पणन मंडळ, पुणे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व बाजार समित्यांचे पदाधिकारी व सचिव यांच्याकरिता एकदिवसीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत असून त्यापैकी सातारा जिल्ह्याची कार्यशाळा आज होत असल्याचे सांगितले.

कार्यशाळेच्या निमित्ताने पणन संबंधित महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रके यांची पुस्तिका तयार करण्यात आली असून सदर पुस्तिका बाजार समित्यांच्या पदाधिकाऱ्यांसह व सचिवांना बाजार समितीचे कामकाज करताना अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे डॉ. सुभाष घुले यांनी निदर्शनास आणून दिले.

कृषी पणन कायदा व त्यामधील महत्त्वाच्या सुधारणांबाबत उपसंचालक, पणन अविनाश देशमुख यांनी, बाजार समितीचे अधिकार व कर्तव्य याबाबत उपनिबंधक, कराडचे संदीप जाधव यांनी, केंद्र शासनाच्या कृषी पणन विषयक विविध योजनांसंबंधी उप कृषी पणन सल्लागार, मुंबई ऋग्वेंद्र मुरगोड यांनी, शेतमालाची निर्यात व कृषी पणन मंडळाचे योगदान याबाबत व्यवस्थापक निर्यात सतीश वराडे यांनी, बाजार समित्यांसाठी असणाऱ्या पणन मंडळाच्या विविध संगणक प्रणाली संदर्भात व्यवस्थापक संगणक कैलास फटांगरे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, समिती सदस्य आणि सचिव उपस्थित होते. यावेळी बाजार समितीच्या रँकिंगमध्ये कोल्हापूर विभागातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या फलटण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भगवानराव होळकर आणि दुसरा क्रमांक मिळवल्याबद्दल लोणंद कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील शेळके पाटील यांचे व त्यांचे सर्व सहकारी संचालक मंडळ आणि सचिव यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. प्रसाद भुजबळ यांनी समारोप व आभार प्रदर्शन केले.

# ‘मालावी मँगो’ मुंबईत दाखल

## पुण्यात आज येणार; अन्य शहरांतही लवकरच मिळणार

ॲग्रोवन वृत्तसेवा Dt. 12/11/2023



पुणे : दक्षिण आफ्रिकेच्या मालावी प्रांतात उत्पादित झालेला ‘मालावी मँगो’ मुंबईत दाखल झाला आहे. हा आंबा आज (ता. १२) पुणे बाजार समितीत उपलब्ध होईल. गेल्या अनेक वर्षांपासून ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात ‘मालावी आंबा’ भारतीयांना चाखता येत आहे.

मालावी आंब्याचे प्रमुख आयातदार संजय पानसरे म्हणाले, ‘‘दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मालावी प्रांतांतून आंब्याची आवक सुरू झाली आहे. शनिवारी (ता.११) ५१८ बॉक्सची आवक झाली. पुढील दोन दिवसांत हा आंबा राज्यातील प्रमुख शहरांमध्ये दाखल होईल. तर रविवारी (ता.१२) तो पुणे बाजार समितीमध्ये देखील उपलब्ध होईल. हा आंबा एक ते दीड डझनाच्या बॉक्समध्ये (१० ते १६ नग) उपलब्ध आहे. एका बॉक्सची किंमत साडेचार ते साडेपाच हजार रुपये आहे. हा हंगाम आणखी महिनाभर चालेल. आवक वाढल्यानंतर दर कमी होण्याची शक्यता आहे.

**हवामान बदलांच्या फटक्यामुळे अनिश्चिततेच्या गर्तेत अडकलेल्या हापूस आंबा भारतीय ग्राहकांबरोबरच जगातील विविध देशातील ग्राहकांना हंगामपूर्व उपलब्ध व्हावा, या उद्देशाने काही उद्योगांनी दापोली, रत्नागिरी येथून हापूस आंब्याची कलमांची हजारो एकरावर व्यावसायिक लागवड केली आहे. त्यातील आंबा आता भारतासह विविध देशांमध्ये उपलब्ध होत आहे.**

**– संजय पानसरे**, प्रमुख आयातदार (मालावी आंबा), नवी मुंबई बाजार समिती

**पुणे बाजार समितीत आज (ता.१२) मालावी आंबा येईल. टप्प्याटप्प्याने हा आंबा पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये मिळेल. या आंब्याचा विशिष्ट ग्राहक निर्माण झाल्याने त्यास मागणी वाढत आहे.**

**– संदीप खैरे**, मालावी आंब्याचे प्रमुख घाऊक विक्रेते, पुणे बाजार समिती

## मंत्रिमंडळ निर्णय : पहिले निर्यात प्रोत्साहन धोरण मंजूर; गुंतवणूकही वाढणार

# राज्यातील निर्यात दुप्पट करण्याचे लक्ष्य


**मुंबई, ता ८ : राज्यातील निर्यात क्षेत्राला गती देऊन थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्याच्या पहिल्या निर्यात प्रोत्साहन धोरणास बुधवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात अंदाजे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. तसेच निर्यातीमध्ये सध्याच्या सात टक्क्यांवरून १४ टक्क्यांएवढी वाढ होण्यास मदत होईल.**

हे धोरण २०२७-२८ पर्यंत राबविण्यात येणार आहे. सध्या राज्याची निर्यात ७२ अब्ज डॉलर असून ती १५० अब्ज डॉलरपर्यंत इतके वाढविणे, राज्यामध्ये पुढील पाच वर्षामध्ये ३० निर्यातीभिमुख पायाभूत सुविधा विकास प्रकल्प विकसित करणे तसेच २०३० पर्यंत देशाच्या एक ट्रिलियन डॉलर निर्यातीच्या उद्दिष्टात राज्याचा २२ टक्के सहभाग साध्य करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

या प्रोत्साहनाचा लाभ राज्यातील सुमारे पाच हजार सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमई) व मोठ्या उद्योग घटकांना होईल. तसेच ४० हजार रोजगार संधी निर्माण होईल.

### निर्णयामुळे लाभ

- जागतिक मूल्य साखळीमध्ये राज्याचा सहभाग वाढविणे शक्य होईल
- राज्याच्या शाश्वत विकासासाठी प्राधान्य क्षेत्रे तसेच सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांच्या निर्यात क्षमतेचा पुरेपूर वापर करुन निर्यातीमध्ये वैविध्य साध्य करणे
- नवीन बाजारपेठा/देश, नवीन निर्यात संभाव्य उत्पादने आणि जिल्ह्यांतील निर्यातक्षम उद्योजक शोधून निर्यातीत विविधता आणणे
- राज्याच्या प्रादेशिकदृष्ट्या संतुलित विकासासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचे निर्यातीतील योगदान वाढवून जिल्हा हेच निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी यामुळे गती मिळेल
- उद्योगमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना करण्यात आली असून या परिषदेस या निर्यात धोरणात आवश्यक सुधारणा करण्याचे अधिकार असणार आहेत



### एअर इंडियाचे बुडीत उत्पन्न व दंड माफ

- नरिमन पॉइंट येथील एअर इंडिया इमारत ताब्यात घेण्यासाठी पाऊले उचलण्यात येत असून एअर इंडियाचे सर्व बुडीत उत्पन्न व अन्य दंड माफ करण्याचा निर्णय आज बैठकीत घेण्यात आला. ही २२ मजली अलिशान इमारत महाराष्ट्र सरकार एक हजार ६०१ कोटी रुपयांस खरेदी करणार आहे. या इमारतीतील जागा शासकीय कार्यालयांसाठी उपलब्ध होऊ शकेल.
- मंत्रालयाला लागलेल्या आगीनंतर अनेक विभाग इतर ठिकाणी विखुरलेले असून त्यांच्या भाड्यापोटी २०० कोटींपेक्षा जास्त खर्च सरकारला करावा लागत आहे. मात्रएअर इंडियाची इमारत ताब्यात आल्यानंतर खर्च कमी होणार आहे.

### अन्य निर्णय

- मौजे गोजुबावी (ता.बारामती) येथे पोलिस श्वान प्रशिक्षण केंद्र उभारणार
- अनुदानित खासगी आयुर्वेद, युनानी महाविद्यालयांतील प्राध्यापकांची पदे राज्य निवड मंडळामार्फत भरणार
- आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणित, विज्ञानात पारंगत करण्यासाठी शिक्षकांची २८२ पदे भरणार
- विदर्भात पाच ठिकाणी आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारणार
- मॉरिशस येथे महाराष्ट्राची माहिती देणारे पर्यटक केंद्र व बहुउद्देशीय संकुल उभारणार
- महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन अधिनियम लागू करून यासाठी प्राधिकरण स्थापण्यास मान्यता

Sakal Dt. 09/11/2023

# राज्याचे निर्यात प्रोत्साहन धोरण मंजूर

Loksatta Dt. 09/11/2023

## २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ४० हजार रोजगारनिर्मिती अपेक्षित

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्याच्या पहिल्या निर्यात प्रोत्साहन धोरणास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून यातून सुमारे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ४० हजार रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. निर्यात क्षेत्राला गती देऊन थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात येणार आहे आणि रोजगारसंधी निर्माण करण्यात येणार आहेत. मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या धोरणासाठी चार हजार २५० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली असून ते २०२७-२८ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

## धोरणात काय...

निर्याताभिमुख विशिष्ट प्रकल्पांसाठी पायाभूत सुविधा कामांसाठी प्रकल्प किमतीनुसार ५० कोटी रुपयांपर्यंत, तर निर्याताभिमुख औद्योगिक उद्यानांसाठी (एक्सपोर्ट ओरिएंटेड इंडस्ट्रियल पार्क) १०० कोटी रुपयांपर्यंत रुपये राज्य शासन अर्थसाहाय्य देणार आहे. यासह निर्यातक्षम सूक्ष्म लघु व मध्यम घटकांना विमा संरक्षण, व्याज अनुदान व निर्यात प्रोत्साहन अनुदान देऊ केली आहेत. तसेच आयात पर्याय शोधण्यासाठी केंद्र शासनाने घोषित केलेल्या १४ क्षेत्रांतील निर्यातक्षम मोठ्या उद्योग घटकांना वीज शुल्क माफी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व विशेष भांडवली अनुदान इत्यादी प्रोत्साहने देण्यात येणार आहेत. प्रत्येक जिल्ह्याचे निर्यातीतील योगदान वाढवून जिल्हा हेच निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी गती मिळणार आहे. उद्योगमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे.

## १८९९ कोटी रुपयांत 'एअर इंडिया' इमारत सरकारकडे

नरिमन पॉइंट येथील २२ मजली 'एअर इंडिया' इमारत राज्य शासन लवकरच खरेदी करणार आहे. या इमारतीच्या विक्रीवेळी शासनाला प्राप्त होणारी २७३ कोटी ४२ लाख रुपयांची अनर्जित रक्कम तसेच २५ कोटी दंड माफ करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. ही इमारत खरेदी करण्यासाठी राज्य सरकारने १६०१ कोटी रुपयांचा देकार दिला असून अनर्जित रक्कम व २५ कोटी रुपयांचा दंड गृहीत धरता ही इमारत राज्य सरकारला सुमारे १८९९ कोटी रुपयांना पडणार आहे.

## धनगर समाज उन्नतीच्या योजनांसाठी समिती

धनगर समाज उन्नतीच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. धनगर समाजाच्या उन्नतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आणि उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची घोषणा तत्कालीन अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. या समितीत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री, आदिवासी विकासमंत्री, ग्रामविकासमंत्री, पशु, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकासमंत्री, वस्त्रोद्योगमंत्री त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांनुसार धनगर व अन्य समाजातील प्रत्येक महसूल विभागातून एक अशासकीय सदस्य, आदी सदस्य असतील.

Dt. 09/11/223

# विदर्भात ५ संत्री प्रक्रिया केंद्रे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** विदर्भात नागपूर येथे ३, तर अमरावती जिल्ह्यात २ अशा ५ ठिकाणी आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे संत्री उत्पादकांना योग्य भाव मिळून योग्य प्रतीची संत्री देशात आणि परदेशात पाठवणे सुलभ होणार आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात यासंदर्भात घोषणा केली होती. नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर व अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलढाणा या ठिकाणी ही केंद्रे उभारण्यात येतील.

या योजनेचा लाभ सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, कृषी उत्पन्न बाजार समिती, खासगी उद्योजक घेऊ शकतील.

### मॉरिशस येथे महाराष्ट्र केंद्र

मॉरिशस येथे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची माहिती देणारे पर्यटक केंद्र व बहुउद्देशीय संकुल उभारण्यात येणार आहे. यासाठी ८ कोटी रुपये खर्च येईल. या पर्यटन केंद्रात पर्यटकांना माहितीशिवाय महाराष्ट्रातील आर्थिक गुंतवणुकीच्या संधीची माहिती मिळेल.

### गोवंशीय प्रजनन प्राधिकरण

राज्यात उच्च उत्पादन क्षमता असलेल्या दुधाळ जनावरांची संख्या वाढविण्यासाठी गोठित रेतमात्रांच्या उत्पादन, साठवणूक, विक्री, वितरण यांचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन नियमन प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे.

### पोलीस श्वान प्रशिक्षण केंद्र

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात गोजुबावी येथे पोलीस श्वान प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. पुणे येथे केवळ २० श्वान व हस्तकांना प्रशिक्षण देण्यात येते. नवीन प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्रात एकाच वेळी ५० श्वानांना प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे.

### आश्रमशाळांची पदे भरणार

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणित व विज्ञानात पारंगत करण्यासाठी शिक्षकांची २८२ पदे भरण्यात येणार आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थी १२ वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झाल्यावर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात.

## वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा

राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करून मेगा वस्त्रोद्योग प्रकल्पांनादेखील उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ देण्याचा तसेच नंदुरबार जिल्ह्याचा समावेश झोन तीनमधून झोन दोनमध्ये करण्यात येणार आहे. विशाल प्रकल्पांना दर्जा व प्रोत्साहने देण्यात येतील अशी सुधारणा वस्त्रोद्योग धोरणात करण्यात आली आहे.

# नागपूरसह पाच ठिकाणी संत्रा प्रक्रिया केंद्रे

## मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा Dt. 09/11/2023

मुंबई : नागपूर, काटोल, कळमेश्वर, अमरावतीतील मोर्शी आणि बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याच्या योजनेस बुधवारी (ता. ८) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी ३९ कोटी ९० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दोन वर्षांसाठी राबविण्यात येणाऱ्या या योजनेत तीन प्रकारचे प्रकल्प उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यांत संत्रा फळाचे काढणीपश्चात हाताळणी नुकसान २५ ते ३० टक्के आहे. राज्यात संत्र्यांवर प्रक्रिया करण्याचे प्रमाण नगण्य असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. त्यामुळे काढणीपश्चात प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी सरकारकडून वित्तीय सहाय्य उबलब्ध करून देणे आणि संत्र्याचे काढणीपश्चात नुकसान कमी होऊन संत्रा उत्पादकांना योग्य भाव मिळण्यासाठी संत्र्यांचे मूल्यवर्धन करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत्रा प्रक्रिया प्रकल्पाची अर्थसंकल्पात घोषणा केली होती. त्यानुसार नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी आणि बुलडाणा येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यास मान्यता देण्यात देण्यात आली आहे. या योजनेसाठी सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि खासगी उद्योजक पात्र ठरणार आहेत. या योजनेअंतर्गत प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प, दुय्यम प्रक्रिया प्रकल्प, उपपदार्थांवरील प्रक्रिया प्रकल्प राबविण्यात येणार आहे. प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांसाठी छोटे पॅकहाउस, २.५ टन क्षमतेचे लहान क्षमतेचे प्रीकूलिंग व २५ टन क्षमतेचे शीतग्रह सार्टिंग ग्रेडिंग व वॅक्सिंग लाइन याचा समावेश असेल या प्रकल्पाची किंमत ४ कोटींच्या मर्यादित राहील. दुय्यम प्रक्रिया प्रकल्पात संत्रा आरटीसी तयार करणे, तसेच प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पासाठी संलग्न म्हणून काम करणे असे स्वरूप असेल. ही मर्यादा ४० लाखांच्या मर्यादित असेल. या योजनेसाठी देण्यात येणारे अर्थसाह्य अनुदान स्वरूपात असेल. लाभार्थ्यांचा १५ टक्के स्वनिधी आवश्यक असेल. तसेच आवश्यकतेनुसार ८५ टक्के अर्थसाह्य बँकेडून कर्ज स्वरूपात मंजूर करून घ्यावे लागणार आहे. या योजनेतून नागपूर, काटोल, कळमेश्वरसाठी प्रत्येक १ तर अमरावतीतील मोर्शीत तीन आणि बुलडाण्यात २ अशी एकूण आठ केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तर पाचही ठिकाणी प्रत्येकी एक उपपदार्थ प्रक्रिया प्रकल्प उभारणार आहे.

# चिंतामणी बाजार समिती मूल्यांकनात राज्यात अव्वल

## पहिल्या चारमध्ये समावेश; खासगी बाजार समित्यांचे मूल्यांकन

ॲग्रोवन वृत्तसेवा Dt. 07/11/2023

यवतमाळ : बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची (स्मार्ट) अंमलबजावणी पणन संचालनालयाकडून केली जात आहे. खासगी बाजार समितीच्या झालेल्या मूल्यांकनात बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यात आले. त्यात यवतमाळ येथील चिंतामणी बाजार समिती राज्यात अव्वल ठरली. यासोबतच शेलू बुद्रुक, वणी, दत्तरामपूर या बाजार समित्याही पहिल्या चारमध्ये आल्या आहेत.

'स्मार्ट' या प्रकल्पाच्या माध्यमातून खासगी बाजार समित्यांचे मूल्यांकन केले जात आहे. २०२२-२३ या वर्षात बाजार समित्यांमधील उपलब्ध सोयीसुविधा, मोजमाप पद्धती, शेतीमाल लिलावासाठी असलेले लिलाव शेड, गोदाम, शेतकऱ्यांच्या नोंदी आदी सुविधांची पाहणी राज्यभरातील खासगी बाजार समित्यांत करण्यात आली होती. बाजार समित्यांत असलेल्या सुविधांच्या आधारे बाजार समित्यांची निवड करण्यात आली. शेतकऱ्यांना दिलेल्या सोयीसुविधा व इतर बाबींत सरस ठरली असून, प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच पुसद तालुक्यातील शेलू बुद्रुक येथील किसान मार्केट यार्ड, वणी येथील महावीर ॲग्रो, आर्णी तालुक्यातील दत्तरामूपर येथील शेतकरी कृषी खासगी बाजार समितीने पहिल्या चारमध्ये स्थान पटकावले आहे.

> **शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सोयीसुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. याशिवाय शेतकऱ्यांना जास्त भाव कसा मिळेल, या प्रयत्नात असतो. अधिकाधिक सुविधा देण्यावर भर आहे.**
>
> **– विजय मुंधडा**, संचालक, चिंतामणी खासगी बाजार समिती, यवतमाळ

